महाराष्ट्र शासनाचा २०१०-२०११ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. सुनिल तटकरे

यांनी गुरुवार, दिनांक २५ मार्च २०१० रोजी
केलेले भाषण

## भाग दुसरा

अध्यक्ष महोदय,

मी आता अर्थसंकल्पाचा भाग-२ सभागृहापुढे सादर करीत आहे.

महसुलाचा आढावा

१. या वित्तीय वर्षाची सुरुवात जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर सुरु झाली होती. जागतिक मंदीच्या प्रभावामुळे कर महसुलातही घट अपेक्षित होती. केंद्र सरकारने देखील त्यांच्या कर महसुली उत्पन्नाचे उद्दिष्ट कमी केले होते. वरील पार्श्वभूमीवर वित्तीय वर्ष २००९-२०१० करीता विक्रीकर विभागाचे महसूलाचे उद्दिष्ट **३१३४६ कोटी** रुपये ठरविण्यात आले होते. मला सभागृहास सांगण्यास आनंद होत आहे की विक्रीकर विभागाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. जागतिक मंदीचे सावट हळू हळू दूर होण्याची चिन्हे दिसत आहेत व यादृष्टीने पुढील वित्तीय वर्षात महसूल वाढीस चालना मिळेल अशी मी आशा करतो.

विक्रीकर विभागाचे संगणकीकरण व करदात्यांना देण्यात आलेल्या अत्याधुनिक सुविधा.

२. सन्माननीय सदस्यांना ज्ञात असेल की मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात विक्रीकर विभागाव्दारे लवकरच करदात्यांना ई-नोंदणी, ई-पेमेंट या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील असे आश्वासन दिले होते. सन्माननीय सदस्यांना सांगण्यास मला आनंद होत आहे की, या दोन्ही सुविधा आता कार्यान्वित झालेल्या आहेत. त्याचबरोबर मागील वित्तीय वर्षात विक्रीकर विभागाने व्यापाऱ्यांना परताव्यासाठी ई-रिफंड व व्यापाऱ्यांनी सादर करावयाचा लेखा परीक्षण अहवाल-७०४, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून घेण्यास सुरुवात केली आहे. नोंदणी दाखला घेणे, विवरणपत्रके व करभरणा करणे, परताव्याचा अर्ज, लेखा परीक्षण अहवाल सादर करणे, तसेच केंद्रीय विक्रीकर कायदयाखालील विविध नमुने घेणे यासाठी इंटरनेटव्दारे ही सुविधा सर्व व्यापाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले महाराष्ट्र हे

देशातील पहिले राज्य ठरले आहे. यामुळे करदात्यांची विक्रीकर विषयक कामे सुलभ झाली आहेत. संगणकीकरणामुळे भविष्यात वस्तू व सेवा कर कायद्याची अंमलबजावणी करणे सोपे जाईल.

कर प्रबोधिनीची स्थापना. ३. अप्रत्यक्ष कराचे उत्पन्न हे राज्याच्या महसूलाचा मुख्य स्त्रोत आहे. भविष्यात वस्तू व सेवा कर लागू होणार आहे. यादृष्टीने विक्रीकर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व त्याच बरोबर कर संकलन संदर्भात संशोधन यासाठी रायगड जिल्हयामध्ये कर प्रबोधिनी स्थापन करण्यात येईल.

मूल्यवर्धित कर कायद्यातील सुधारणा. ४. मूल्यवर्धित कर कायद्यातील काही कलमांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. हे बदल काही तांत्रिक व काही विक्रीकराच्या दैनंदिन अंमलबजावणीशी संबधित आहेत. या अनुषंगाने कर सुधारणा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यात येईल. या सुधारणांमध्ये व्यवहार निहाय निर्धारणा करणे, अंशत: परतावा देण्यासंबंधी तरतूद करणे, कलम ६३(७) खालील सूचना व काही प्रकारच्या व्याज आकारणी विरुध्द अपिल नसणे, कलम ३५ मध्ये सुधारणा, नवीन नोंदित व्यापाऱ्यांसाठी तिमाही विवरणपत्रकाची तरतूद करणे व कलम २९ मधील सुधारणांचा समावेश आहे.

व्यवसायकर व ऐषाराम करासाठी ई-सेवा. ५. मूल्यवर्धित कर कायद्यातील विवरणपत्रके इलेक्ट्रॉनिक स्वरुपात घेण्यास सुरुवात झालेली आहे. त्याचबरोबर व्यवसायकर व ऐषाराम कर कायद्यातील विवरणपत्रे सुध्दा इलेक्ट्रॉनिक स्वरुपात दाखल करण्याची सुविधा व्यापाऱ्यांना येत्या आर्थिक वर्षात देण्यात येईल. विक्रीकर विभागाची व्हॅट अंमलबजावणीनंतर पुनर्रचना करण्यात आलेली आहे. याच धर्तीवर व्यवसायकर विभाग व व्यवसायकर कायद्यामध्ये अनुरुप बदल करण्याची आवश्यकता आहे. तशा सुधारणा करण्यात येतील.

ग्राहकांना बिल न देणाऱ्या विक्रेत्यांविरुध्द कडक कारवाई.

६. खरेदी केलेल्या प्रत्येक वस्तूचे बिल ग्राहकाला मिळाले पाहिजे. काही विक्रेते विक्रीची बिले देत नाहीत व पर्यायाने त्या विक्रीवरील कर चुकविला जातो. ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने बिल न देण्याऱ्या विक्रेत्यांविरुध्द शास्तीची कारवाई आता अधिक कडक करण्यात येत आहे.

जलदगतीने परतावा देण्याविषयी सुधारणा.

७. मूल्यवर्धित कर प्रणालीच्या अंमलबजावणीनंतर विक्रीकराचा परतावा घेणाऱ्या व्यापाऱ्यांच्या संख्येत मोठया प्रमाणावर वाढ झाली आहे. व्यापाऱ्याने दाखल केलेल्या परताव्याची खातरजमा करण्याकरीता त्यांनी खरेदीवर भरलेल्या कराची पडताळणी करावी लागते. हे काम सध्या प्रत्यक्ष भेट देऊन करावे लागते. यामुळे व्यापाऱ्यांना परतावा मिळण्यास बराच वेळ लागतो. व्यापाऱ्यांना जलद गतीने परतावा प्रदान करण्याकरीता यापुढे विक्री बिलात खरेदीदार व्यापाऱ्यांचा टीन क्रमांक टाकणे बंधनकारक असेल. यामुळे व्यापाऱ्यांने मागितलेल्या वजावटीची खातरजमा संगणकावर होऊन व्यापाऱ्यांना परतावा लवकर मिळण्यास मदत होईल.

बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकरिता आपसमेळ योजना.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाने काही वर्षापूर्वी दिलेल्या निर्णयामुळे सदनिकांच्या बांधकाम साहित्यावर विक्रीकराची आकारणी होते. परंतु या कराची परिगणना सुलभ करण्याबाबत अनेक ग्राहक व ग्राहक संघटनांकडून सातत्याने मागणी होत आहे. त्यांच्या मागणीचा साकल्याने विचार करुन मी आता बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकरिता एक सोपी आपसमेळ योजना जाहीर करीत आहे. या अंतर्गत करारपत्रातील घरांच्या विक्रीच्या किंमतीवर एक टक्का दराने कर आकारणी करण्यात येईल. तथापि बांधकाम व्यावसायिकांना व विकासकांना मूल्यवर्धित कराची वजावट अनुज्ञेय असणार नाही. ही आपसमेळ योजना दिनांक १ एप्रिल २०१० पासून पुढे नोंदणी होणाऱ्या करारपत्रांच्या बाबतीत लागू राहील.

**लहान हॉटेल्स व लॉजना ऐषाराम करात सवलत.**

९. ऐषाराम कर कायद्याच्या तरतुदीनुसार सध्या ज्या हॉटेल्समध्ये प्रति निवास, प्रति दिन रुपये २०० पर्यंत भाडे आहे त्याला ऐषाराम कर लागत नाही. रुपये २०० ते रुपये १२०० पर्यंत भाडे असल्यास ४ टक्के व रुपये १२०० वरील भाडे असणाऱ्या निवासास १० टक्के कर लागतो. लहान हॉटेल्स व लॉज यांच्यासाठी मी करपात्रतेची मर्यादा वाढवित आहे. आता रुपये ७५० पर्यंत प्रति निवास भाडे करमुक्त करण्यात येत आहे. रुपये ७५० च्या वर भाडे असणाऱ्या हॉटेल्सना लागणाऱ्या करात कोणताही बदल प्रस्तावित नाही.

**लेखा परिक्षणाच्या उलाढाल मर्यादेत वाढ.**

१०. मूल्यवर्धित कर कायद्याच्या कलम ६१ खालील लेखा परीक्षणासाठी आवश्यक उलाढालीची मर्यादा रुपये ४० लाखांवरुन रुपये ६० लाखांपर्यंत वाढविण्यात येईल. तसेच, सामूहिक प्रोत्साहन योजनेखालील सर्व व्यापाऱ्यांना आता लेखा परीक्षण अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.

**लहान व्यापा-यांना कर भरणा करण्याच्या कालावधीत वाढ.**

११. राज्यातील एकूण व्यापाऱ्यांपैकी सहामाही विवरण पत्रक भरणाऱ्या लहान व्यापाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. त्यांना कर भरणा करण्यासाठी सध्या एकवीस दिवसांची मुदत आहे. त्याऐवजी हा कालावधी तीस दिवसांचा करण्यात येत आहे.

**कर सवलती.**

१२. देशातील सर्व राज्यांमध्ये मूल्यवर्धीत करप्रणाली जवळपास सारखी आहे. या कायद्यामध्ये कर सवलती देण्यास फारसा वाव नाही. तरीसुध्दा ज्या गोष्टी दैनंदिन गरजेच्या व सर्वसामान्यांच्या वापरातील आहेत त्यावर कर न लावण्याचे किंवा कराचा बोजा कमी करण्याचे मी ठरविले आहे.

अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तू तसेच मनुका, बेदाणे आणि चहावरील कर सवलतीस मुदतवाढ.

१३. सध्या तांदूळ, गहू, डाळी व त्यांचे पीठ तसेच मिरची, हळद, गूळ, चिंच, नारळ, धने, मेथी व सुवा, पापड व खजूर, सोलापूरी चादरी व टॉवेल्स अशा अत्यावश्यक वस्तूंना ३१ मार्च २०१० पर्यंत करमाफी आहे. शक्ती प्रदत्त समितीने या वस्तूंवर ४ टक्के कराची शिफारस केली आहे. तरीही सर्वसामान्यांच्या या गरजेच्या वस्तूंच्या किंमती आटोक्यात रहाव्यात म्हणून मी ही करमाफी ३१ मार्च २०११ अथवा जी.एस.टी लागू होईपर्यंत जो कालावधी कमी असेल त्यासाठी चालू राहील असे घोषित करतो.

मनुका, बेदाणे आणि चहावर शक्ती प्रदत्त समितीने १२.५ टक्के दराची शिफारस केली आहे. तरीही या वस्तूंवर दिनांक ३१ मार्च २०११ अथवा जी.एस.टी. लागू होईपर्यंत जो कालावधी कमी असेल त्यासाठी सवलतीच्या ५ टक्के दराने कर आकारला जाईल. याबाबतच्या अधिसूचना तात्काळ निर्गमित करण्यात येत आहेत.

एव्हिऐशन टर्बाइन फ्युएल वरील करसवलतीस मुदतवाढ.

१४. मुंबई व पुणे व्यतिरिक्त असलेल्या छोटया शहरांना विमान मार्गाने जोडण्यासाठी व हवाई वाहतुकीस प्रोत्साहन देण्यासाठी, छोटया विमान तळावरुन विक्री केलेल्या एव्हिएशन टर्बाईन फ्युएल वरील कराचा दर ३१ मार्च २०१० पर्यंत ४ टक्के करण्यात आला होता. ही कर सवलत ३१ मार्च २०११ अथवा जी.एस.टी. लागू होईपर्यंत जो कालावधी कमी असेल त्यासाठी चालू ठेवण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

ब्लड ट्रान्सफ्युजन उपकरणांवर कर सवलत.

१५. रुग्णांना रक्त देण्याकरीता ब्लड ट्रान्सफ्युजन उपकरणाची आवश्यकता असते. काही प्रकारच्या असाध्य रोगांमध्ये, जसे थेलेसिमिया अथवा सिकलसेल रुग्णांना वारंवार रक्त देण्याची गरज भासते. अशा रुग्णांच्या उपचारांचा आर्थिक बोजा कमी व्हावा यादृष्टीने, मी या उपकरणांवरील १२.५ टक्के कर कमी करण्याचे योजले आहे. हा कर आता ५ टक्के असेल.

सौर कंदील करमुक्त.

१६. राज्यातील विजेची वाढती मागणी नियंत्रणात ठेवण्यासाठी व पर्यावरणाची हानी रोखण्याकरीता अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर होणे गरजेचे आहे. मागील वर्षी सौरउर्जेवर चालणाऱ्या विविध उपकरणांना मूल्यवर्धित करातून माफी देण्यात आली होती. या वस्तूंच्या यादीमध्ये वाढ करुन सौर कंदीलसुध्दा आता करमुक्त करण्यात येत आहे.

बॅटरी अथवा सौर उर्जेवर चालणा-या वाहनांना कर सवलत.

१७. वायू प्रदूषित न करता पर्यावरणाची हानी रोखणाऱ्या व इंधनाची बचत करणाऱ्या बॅटरी अथवा सौर उर्जेवर चालणाऱ्या वाहनांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यांच्या किंमती कमी करण्यासाठी मी अशा वाहनांवरील कर १२.५ टक्के वरुन ५ टक्के करीत आहे.

कापूर, धूप लोबान व कात करमाफ.

१८. कापूर या वस्तूचा वापर प्रामुख्याने धार्मिक कारणासाठी किंवा औषध म्हणून होतो. त्याचप्रमाणे धूप व लोबान धार्मिक कार्यासाठी लागतात. काताचा वापर पान म्हणजेच विडा यामध्ये केला जातो. सर्वसामान्यांच्या वापरातील या वस्तू असल्याने मी कापूर, धूप, लोबान व कात या वस्तूंवरील कर माफ करीत आहे.

हेअरपिन वर कर सवलत.

१९. हेअरपिन ही वस्तू महिलांच्या नित्य वापरातील वस्तू आहे. मागील वर्षी कृत्रिम दागिन्यांवरील कराचा दर ४ टक्के वरुन १ टक्का केला होता. हेअरपिन या वस्तूवरील कर हा नकली दागिन्यां एवढा कमी करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत होती. या मागणीचा विचार करुन हेअरपिन्स वरील कराचा दर ४ टक्के वरुन कमी करुन १ टक्का करण्याचे मी ठरविले आहे.

फरसाणच्या यादीत वाढ.

२०. साबुदाणा चिवडा, चनाचूर व खांडवीवरील कराचा दर जास्त असल्याने तो कमी करण्यात यावा अशी मागणी सातत्याने होत आहे. त्यांच्या मागणीचा विचार करुन मी या पदार्थांचा समावेश फरसाणच्या यादीमध्ये करण्याचे ठरविले आहे.

एच.डी.पी.ई. फॅब्रिक व्हर्मी कंपोस्ट बेड व सरकीपेंड करमुक्त.

२१. कृषी क्षेत्रात नवीन प्रयोग करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी गांडूळ खत निर्मितीमध्ये उपयोगात येणाऱ्या व्हर्मीकंपोस्ट बेडवर कर माफ करण्यात येत आहे. सरकीपेंड चा उपयोग मोठया प्रमाणात पशुखाद्य म्हणून करण्यात येतो. शेतकऱ्यांवरील आर्थिक बोजा कमी करण्याकरीता मी सरकीपेंड करमुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

खादी ग्रामोद्योग घटकाने उत्पादित केलेला साबण कर माफ.

२२. ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी खादी ग्रामोद्योग बोर्डाने मान्यता दिलेले जे उद्योग हस्तनिर्मित साबण व्यवसायात आहेत, त्यांनी बनविलेल्या कपडे धुण्याच्या साबणाच्या विक्रीवर करमाफी जाहीर करण्यात येत आहे.

मुंबई मोटार वाहनकर अधिनियम (१९५८) मध्ये सुधारणा.

२३. ऑटो रिक्षा व काळी-पिवळी मीटर टॅक्सी या वाहनांवर सध्या दरवर्षी मोटार वाहन कर आकारला जातो. यामुळे वाहन धारकांना वारंवार कार्यालयात यावे लागते. शासनास करवसुली सुलभ व्हावी म्हणून ऑटोरिक्षा व काळी-पिवळी मीटर टॅक्सी यांच्यावर आता एकरकमी कर आकारण्याचे मी घोषित करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**